दिनांक ३०.०४.२०१९ पर्यंत अद्यावत माहितीनुसार

श्री प्रमोद रेंघे
सेवानिवृत्त लेखा अधिकारी,
महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्ग
मो. ९८२२८६५६१९

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१

भाग - १

राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांची वेतन विषयक अनुज्ञेयता ज्या नियमांचे आधारे ठरविले जाते त्या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ असे संबोधले जाते. तरी या नियमांची ओळख करुन घेणे इष्ट राहील.

उगम:

महारष्ट्र नागरी संवा नियमांचे उगमस्थान हे भारतीय प्रजासत्ताकाची राज्य घटना आहे. त्यामध्यील परिच्छेद (३०९) हे आहे. भारतातील सर्व केंद्र व राज्य सरकारांना भारताच्या राज्य घटनेने शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींचे नियमन करण्यासाठी नियम करावेत असे निर्देश दिले आहेत. या कलमाचा वापर करुन शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा नियम तयार केले आहेत सदर नियम अस्तित्वात येण्यापूर्वी म्हणजेच मुंबई राज्य असल्यापासून मुंबई नागरी सेवा नियम अस्तित्वात होते. (BCSR) त्या नियमातील कालबाह्य तरतुदी वगळून व आवश्यक तरतुदींचा समावेश करुन महारष्ट्र नागरी सेवा नियमांची रचना केली आहेत. प्रस्तुत नियमांचे विषयाप्रमाणे निरनिराळे भाग केले आहेत व त्यासाठी स्वतंत्र नामाभिदान दिलेले आहे. उदा: वेतन, रजा, निवृत्तीवेतन, पदग्रहण अवधी, वर्तणूक नियम, शिस्त व अपील वगैरे.

त्याचप्रमाणे भारतीय राज्य घटनेच्या तत्वानुसार व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेशाच्यावेळी जे सेवाविषयक नियम अस्तीत्वात असतील त्यामध्ये कर्मचाऱ्यांचे नुकसान होईल असा बदल करता येत नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ६ मध्ये हे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांवर या नियमात स्वैर बदल करण्यावर बंधन आले आहे. या तरतुदींसाठी भारतीय राज्य घटनेचे शतश: आभारी राहणे आवश्यक आहे.

वेतन विषयक तरतुदींचा अभ्यास करताना सहाव्या व सातव्या वेतन आयोगामुळे जे बदल झाले आहेत. त्याचाही विचार प्रत्येक ठिकाणी करणे गरजेचे आहे. वेतन आयोगाच्या शिफारशी वेतनश्रेणी पुरत्याचा मर्यादित राहील्या नसून पदोन्नतीची, कालबद्ध पदोन्नतीची वेतन निश्चिती, तसेच वेतन वाढीचा दर वेतन वाढीच्या तारखा या संकल्पनेतही मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली आहे. त्यामुळे त्या त्या नियमांच्या अनुषंगाने केलेल्या सुधारणांचा विचार करावा लागेल.

प्रारंभ व व्याप्ती (नियम क्रमांक १ ते ८) :

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ ची अमंलबजावणी दिनांक १५ ऑगस्ट १९८१ पासून सुरु झाली आहे. सदर नियम सामान्यत: महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या पूर्ण वेळ आणि वेतन श्रेणीत काम करत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होतात. मात्र करार पद्धतीने ज्यांना वेतन देण्यात येते अशा कर्मचाऱ्यांना या नियमांच्या तरतूदी लागू होत नाहीत. तसेच अर्धवेळ किंवा रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांनाही हे नियम लागू होत नाहीत. स्वीयेत्तर सेवेतील शासकीय कर्मचाऱ्यांना हे नियम लागू होतील.

प्रस्तुत नियमाचा अर्थ लावण्याचा अधिकार शासनाने स्वत:कडे ठेवला आहे. तसेच सदर नियम शिथिल करणे किंवा सवलत देणे हे अधिकारही शासनाने राखून ठेवले आहेत. (स्वत:कडे) तसेच या नियमातून जर एखादी सवलत कोणा कर्मचाऱ्यांस दिली तर त्याची कारणे लेखा परिक्षा अधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक आहे. तसचे असे आदेशही लेखा परिक्षा अधिकाऱ्यांना पाठविणे आवश्यक आहे. प्रस्तुत नियमांचा वापर हा शासनाने ज्या अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केला आहे, त्यांनीच त्याचा वापर करावा व ज्या विशिष्ट नियमाखाली अधिकार प्रदान केलेले नाहीत, तो अधिकार शासनाकडेच राहील व शासनाच्या परवानगीशिवाय त्या त्या नियमाखाली कार्यवाही करता येणार नाही. तसेच ज्या ज्या वेळी या नियमात ज्या तरतुदी असतील त्या तरतुदींच्या आधारे त्या त्या वेळी कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते नियमित होतील तसेच या नियमात ज्या सुधारणा होतील त्याची अमंलबजावणी शासनाने नमूद केलेल्या तारखापासून सुरु होईल.

भाग-२

व्याख्या : (नियम ९ पहा.)

१. व्याख्या: अधिकारी/लेखा परिक्षा अधिकारी : (नियम ९(४))

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी राज्याचे अथवा विभागाचे लेखे ठेवण्यासाठी व अनुज्ञेयता ठरविण्यासाठी तसेच लेखा परिक्षण करण्यासाठी नेमलेला अधिकारी म्हणजेच महालेखापाल होय.

२. संवर्ग : (नियम ९(५))

ठराविक पदांचा समूह अथवा सेवेतील घटक सदर संवर्ग हा प्रत्येक विभागांर्तगत, राज्यव्यापी प्रादेशिक स्तर, अथवा कार्यालय स्तरावरील पदनिहाय असतो. संवर्ग निहाय पदोन्नतीची संधी असतात, तसेच वरीष्ठ किंवा कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक, जेष्ठता विषयक बाबींची तुलना ही त्या त्या संवर्गापुरतीच मर्यादीत असते.

३. दिवस : (नियम ९(१३))

एका मध्यरात्री (१२ वाजल्यापासून) दुसऱ्या दिवशीच्या मध्यरात्री (१२ वाजेपर्यंतचा) २४ तासांचा कालावधी असतो. त्या काळास दिवस असे संबोधले जाते. मृत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते त्याच्या मृत्युंच्या दिनांकापर्यंत द्यावे अशी तरतूद वित्तीय नियमात असल्याने पहाटे चार वाजता मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांसही त्या दिवसापर्यंतचे वेतन देणे बंधनकारक आहे.

४. कर्तव्य: (नियम ९(१४))

शासकिय कर्मचारी करीत असलेले दैनंदिन कामकाज हा कर्तव्य कालावधीचा भाग असून त्याशिवाय परिविक्षाधीन काळ पदग्रहण अवधी, परिक्षा कालावधी, (दोन वेळा) प्रशिक्षण काळ प्रतिक्षाधीन कालावधी तसेच स्वीयेत्तर सेवेतील कालावधी हा ही कर्तव्याचा भाग असतो मात्र निलंबन काळ हा कर्तव्याचा भाग होत नाही.

५. राजपत्रित अधिकारी : (नियम ९(२०))

अखिल भारतीय अथवा राज्य सेवेतील अधिकारी की ज्यांच्या नेमणुका, बदली, रजा, वगैरे बाबी शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होतात त्यांना राजपत्रित अधिकारी असे संबोधले जाते. तसेच काही वर्ग २ च्या

अधिकाऱ्यांची नेमणूक विभाग प्रमुख करतात परंतु त्यांच्या नेमणुका राजपत्रात प्रसिध्द होत नाहीत. त्यांनाही राजपत्रित अधिकारी समजले जाते. मात्र काही दुय्यम सेवेतील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका न्यायीक अधिकार असल्यामुळे जरी राजपत्रात प्रसिध्द झल्या तरी ते कर्मचारी राजपत्रित अधिकारी ठरत नाहीत.

६. शासन: (नियम ९(२१))

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल म्हणजेच शासन होय. राज्याच्या सर्व कारभार हा त्यांच्या वतीने व त्याच्या नावाने पाहिला जातो. कोणतेही राज्य हे केव्हाही राज्यपालांच्या अनुपस्थितीत चालविता येणार नाही. त्यामुळे राज्यपालांचे बदली अथवा मृत्युपश्चात काही तासातच राज्याचे मुख्य न्यायाधीश राज्यपाल म्हणून कार्यभार स्विकारतात.

७. निवृत्ती वेतन : (नियम ९(३४))

शासकीय कर्मचारी सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यास एक रकमी व मासिक पध्दतीने किंवा त्याच्या मृत्यू पश्चात कुटुंबास एक रकमी किंवा मासिक पद्धतीने जी रक्कम दिली जाते त्यास निवृत्ती वेतन म्हणतात. एक रकमी रक्कम ही उपदान असते व उपदान हा निवृत्ती वेतनाचा भाग आहे असे नियमात स्पष्ट केले आहे.

८. वेतन : (नियम ९(३६))

वेतन म्हणजे कर्मचाऱ्याने धारण केलेल पदास लागू असणारी समय श्रेणीतील टप्प्यावर आहरीत करीत असणारी रक्कम तसेच अनुज्ञेय असल्यास महागाई वेतन याशिवाय कर्मचाऱ्यांस मंजूर असलेले वैयक्तिक वेतन व विशेष वेतन हाही वेतनाचा भाग आहे. दिनांक ०१ जानेवारी १९८६ पासून मात्र विशेष वेतन हा जरी वेतनाचा भाग असला तरी त्या रकमेवर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत. दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून वेतन बँडमधील वेतन +अनुज्ञेय ग्रेड वेतन हा वेतनाचा भाग आहे. **दिनांक ०१/०१/२०१६ पासून वेतन मॅट्रीक्स / वेतनस्तरातील ज्या टप्प्यावर कर्मचारी रक्कम आहरीत करतो ती रक्कम + वैयक्तिक वेतन असल्यास ती रक्कम ही त्याचे वेतन राहील.**

९. निवृत्ती वेतनार्ह वेतन : (नियम ९(३८))

शासकिय कर्मचाऱ्यांची निवृत्ती वेतनाची अनुज्ञेयता ठरविण्यासाठी त्याच्या सेवा निवृत्ती दिनांकापासून अलीकडे दहा महिन्यांत जे वेतन आहरीत केलेअसते त्यावरून सरासरी वेतन निश्चित होते. त्यास निवृत्ती वेतनार्ह वेतन असे संबोधले आहे. दिनांक ०१.०१.२००६ पासून शासनाने ज्या सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार दिनांक ०१.०१.२००६ पासुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत असे सरासरी वेतन किंवा त्याचे अंतिम वेतन यापैकी जी रक्कम जास्तीत जास्त असेत ती निवृत्ती वेतनार्ह वेतन म्हणून ग्राह्य धरली जाईल. दिनांक ०१.०१.२०१६ पासून **वेतन मॅट्रीक्स किंवा वेतन स्तरामधील** ज्या टप्प्यावर तो कर्मचारी जी रक्कम आहरित करतो ती व असल्यास वैयक्तीक वेतन हे रक्कमा विचारात घेता येईल. अंतिम वेतन म्हणजे सेवा पुस्तकात जी वेतन निश्चिती ची किंवा वेतनावाढीची नोंद आहे ती रक्कम लक्षात घ्यावी असे आदेश शासनि निर्णय वित्त विभाग दिनांक ०९.०६.२०१६ अन्वये सुचित केले आहेत.

१०. निवृत्ती वेतनार्ह सेवा : (नियम ९(३९))

निवृत्ती वेतन मिळण्यासाठी जी जी सेवा ग्राहय धरली जाते त्यास निवृत्ती वेतनार्ह सेवा किंवा अहर्ताकारी सेवा असे संबोधले जाते.

११. वैयक्तिक वेतन : (नियम ९(४१))

शासकीय कर्मचाऱ्यांच्यावर पद नष्ट केल्यामुळे पदावनत करण्याची वेळ आली अथवा वेतन पुर्नरचनेत त्याचे वेतन जर कमी होणार असेल तर त्याचे कायम पदाचे वेतन व नविन वेतन यामध्ये जो फरक असेल तो वैयक्तिक वेतन म्हणून समजला जातो व असे वैयक्तिक वेतन त्या कमर्चाऱ्यास मिळणाऱ्या पुढील वेतनवाढीस समायोजित केले जाते. अपवादात्मक बाबतीत काही वैयक्तिक बाबी विचारात घेऊन मंजूर केलेल ज्यादा वेतन हे सुध्दा वैयक्तिक वेतन असते.

१२. विशेष वेतन : (नियम ९(४८))

सर्वसामान्य कर्मचाऱ्यांच्या तुलनेने जेंव्हा एखादा कर्मचारी जास्त जिकिरीचे / धोक्याचे मेहनतीचे (जास्त) काम करीत असेल तेव्हा या कामाचा मोबदला म्हणून जी रक्कम मंजूर केली जाते त्यास विशेष वेतन म्हणतात दिनांक ०१ जानेवारी १९८६ पासून या रकमेवर महागाई भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय नाहीत.

“भाग - ३”

वेतन अनुज्ञेयता व निश्चिती

सेवा प्रवेशा नंतरचे वेतन (वेतन १०) :

शासकीय सेवेमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस त्याची ज्या पदावर नेमणूक झाली आहे त्या पदास अनुज्ञेय असलेल्या समय वेतन श्रेणीच्या पहिल्या टप्प्यावर म्हणजे किमान वेतनावर वेतन आहरीत करण्यास सुरुवात करेल. मात्र ज्या पदांकरता उच्च प्रारंभिक वेतन मंजूर केले असेल त्या ठिकाणी तो कर्मचारी मंजूर प्रारंभिक उच्च वेतन आहरीत करेल. दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून वेतनाच्या नियमात जी सुधारणा केली आहे त्याप्रमाणे दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून प्रथम नियुक्तीच्या वेळी शासन निर्णय दिनांक २२ एप्रिल २००९ मधील जोडपत्र क्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक पदास मंजूर ग्रेड वेतनाच्या अनुषंगाने जे उच्च प्रारंभिक वेतन दर्शविले आहे. त्या वेतनावर तो कर्मचारी वेतन अहरीत करण्यास सुरुवात करेल. उदा. ५२००-२०२०० याच वेतन बँडमध्ये ग्रेड वेतनाच्या अनुषंगाने उच्च प्रारंभिक वेतन खालील प्रमाणे राहील.

अ. क्र.	ग्रेड वेतन	उच्च प्रारंभिक वेतन
१	१९००	५८३०
२	२४००	७५१०

दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासून ज्या वेतनस्तरात त्यांची नेमणूक केली असेल त्या मधील किमान वेतनावर कर्मचाऱ्यास सुरुवातीचे वेतन मिळेल. विशिष्ट संवर्गासाठी शासनाने किमान टप्प्या पेक्षा अधिक वेतन विहीत केले असल्यास त्याचे उच्च प्रारंभिक वेतन म्हणता येईल.

पदोन्नती नंतरची वेतन निश्चिती (नियम ११) :

दिनांक ०१ एप्रिल १९७१ पूर्वी पदोन्नती मिळाल्यानंतर कर्मचाऱ्यास जुन्या पदाच्या वेतनानंतरचा नविन वेतन श्रेणीत जो टप्पा असेल त्या टप्प्यावर अथवा जुन्या पदाचे वेतन नवीन पदाच्या वेतन श्रेणीच्या किमान टप्प्यापेक्षा कमी असेल तेव्हा तो कर्मचारी नविन पदाच्या किमान टप्प्यावर वेतन आहरित करित असत. या संकल्पनेत बदल केला व कर्मचाऱ्यास पदोन्नती पुर्वीच्या वेतन श्रेणीतील त्याचे वेतन एक काल्पनिक वेतनवाढ देऊन जी रक्कम येईल त्या रकमेच्या पुढील टप्प्यावर जरी टप्पा असेल तरी पुढील टप्प्यावर नविन वेतनश्रेणीत

त्याचे वेतन निश्चित करावे. अशी येणारी रक्कम ही जर नविन वेतन श्रेणीच्या किमान वेतनापेक्षा कमी असल्यास तो कर्मचारी पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीच्य किमान टप्प्यावर वेतन आहरीत करेल. पुढील वेतनवाढ वेतन वाढीसाठी जो कालावधी आवश्यक आहे तो पूर्ण केल्यावर देण्यात यावी (सामान्यत: १२ महिन्यात) सदर सुधारणा दिनांक ०१ एप्रिल १९७१ पासून केली आहे.

सुरुवातीस सदर तरतूद ही काही विशिष्ट वेतनश्रेणीसाठी होती. (वर्ग २ पर्यंत मर्यादित) परंतु दिनांक ०१ जानेवारी १९८६ पासून सदर तरतूद वर्ग १ मधील सर्व पदांना लागू करण्यासत आलेली आहे. त्यामुळे सर्वच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ही तरतुद लागू करण्यात आलेली आहे. (नियम क्रमांक ११(१)(अ)) सदर तरतुद बढती किंवा शासकीय कर्मचाऱ्याची उच्च पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती झाली तरीही लागू होते. मात्र पूर्वीच्या पदापेक्षा नविन पदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये या वाढीव असणे जरुरीचे आहे. सामान्यत: पदोन्नतीपूर्वीच्या पदाच्या वेतन श्रेणीतील किमान व कमाल टप्पा व नविन पदाच्या वेतन श्रेणीतील किमान व कमाल टप्पा हा प्रथमदर्शनी जास्त असतो, तेव्हा जबाबदाऱ्या मध्ये वाढ होते हे स्पष्टपणे दिसते. अशा प्रकरणात या तरतुदीच्या अनुषंगाने वेतननिश्चिती करावी. शासकीय कर्मचाऱ्यांची नामनिर्देशनाने नेमणूक झाल्यास वेतन निश्चिती शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन/१२८९/प्र.क्र.२/९०/सेवा.२, दिनांक २३.०३.१९९४ मधील सुचनांप्रमाणे करण्यात यावी. कर्मचाऱ्याने विहित मार्गाने संबंधित प्राधिकाऱ्याकडे अर्ज केलेला असावा.

१. नविन नेमणुकीमुळे जबाबदाऱ्यात वाढ होणारे असेल तर नियम ११ (एक) (अ) च्या तरतुदी प्रमाणे काल्पनिक वेतनवाढीचा फायदा देऊन वेतन निश्चिती करावी.
२. नविन पदाच्या जबाबदाऱ्या जुन्या पदापेक्षा कमी महत्वाच्या असतील तर जुन्या पदावरील जेवढया वेतनवाढी आहरित केल्या असतील तेवढयाच वेतनवाढी नविन पदाचे वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहतील.
३. समान दर्जाच्या पदावरील नियुक्ती असेल (म्हणजेच एकाच वेतनश्रेणीत) तर आहे तेच वेतन राहील.
४. अन्य तपशीलासाठी शासन निर्णय पहावा.

काही वेळेस जुन्या व नविन पदाची वेतन श्रेणी एकच असते. अशा प्रकरणात नविन पदावर नेमल्यामुळे जबाबदाऱ्या मध्ये वाढ होते असे नि:संशय पणे म्हणता येत नाही. त्यामुळे या नियमांची तरतूद लागू होणार नाही. परंतु नियम क्रमांक ११ खालील टीप १ प्रमाणे विभाग प्रमुखांनी एकाच वेतन श्रेणीत पदोन्नती / नेमणूक झाली

असली तरीही नविन पदांच्या जबाबदारीत वाढ होत आहे असे प्रमाणपत्र दिल्यास त्या कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती नियम क्रमांक ११(१)(ए) च्या तरतुदीप्रमाणे करता येईल.

शासनाने शासन निर्णय दिनांक ०६ नोव्हेंबर १९८४ प्रमाणे पदोन्नती पूर्वीच्या पदाची वेतनवाढ ज्या दिवशी देय आहे त्या दिवशी ती वेतन वाढ घेऊन नंतर नियम क्रमांक ११(१)(ए) च्या तरतुदीप्रमाणे म्हणजेच काल्पनिक वेतन वाढीचा फायदा घेऊन वेतननिश्चिती करण्याचा विकल्प देण्यास परवानगी दिली आहे. अशा वेळी पदोन्नतीच्या दिवशी काल्पनिक वेतन वाढ न देता पूर्वीच्या वेतनाच्या पुढील टप्प्यावर नविन वेतनश्रेणीत वेतननिश्चती करावी व ज्या दिवशी वेतनवाढ देय होईल त्यादिवशी प्रथम जुन्या पदाची वेतनवाढ नंतर एक काल्पनिक वेतनवाढ देऊन जे वेतन येईल त्याच्या पुढील टप्प्यावर नविन वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करावी. अशा प्रकारचा विकल्प हा पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे बाबतीत अनुज्ञेय असतो. हा विकल्प संवर्गबाहय अथवा तद्र्थ पदोन्नतीसाठी अनुज्ञेय नसतो. (शासन निर्णय दिनांक ०५.१२.१९८५ व दिनांक २४.०२.१९८६)

निवडश्रेणी :

शासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक निवडश्रेणीत जेव्हा केली जोते तेव्हा त्याची वेतननिश्चती सध्याच्या वेतनानंतरच्या पुढील टप्प्यावर नविन वेतन श्रेणीत करण्यात यावी किंवा नविन वेतन श्रेणीतील किमान टप्पा हा त्याच्या जुन्या पदाच्या वेतनापेक्षा जास्त असेल तर किमान टप्प्यावर वेतननिश्चिती होईल. लघुलेखक व उपजिल्हाधिकारी यांची निवड श्रेणीतील नेमणूक ही याबाबतीत अपवाद असून या दोन्ही पदाच्या बाबतीत वेतननिश्चिती (नियम ११(१)(ए)) प्रमाणे करावी.

शासनाने दिनांक ०१ एप्रिल १९७१ पासून पदोन्नतीसाठी काल्पनिक वेतनवाढीचा फायदा देणे सुरु केले. त्यावेळी सदर नियमाच्या अंमलबजावणी मुळे काही जणांचे पदोन्नतीनंतरचे जे वेतन निश्चित झाले होत. त्यापेक्षा त्यांचा कनिष्ठ कर्मचारी पदोन्नत झाल्यानंतर त्याचे वेतन जास्त निश्चित होत होते. एकाच संवर्गातील वरिष्ठ कर्मचारी हा त्याच्या मूळ पदाच्या वेतन वाढीच्या दिनांकापूर्वी पदोन्नत झाला व कनिष्ठ कर्मचारी वेतन वाढ होऊन पदोन्नत झाला तर अशी अनियमितता होत होती. अशा प्रकरणात त्या वरीष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन त्याच्यापेक्षा कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीनंतर निश्चित केलेल वेतनाएवढे उंचावून देण्याची तरतूद नियम ११ खालील सुचना १ मध्ये केलेली आहे. मात्र त्याकरिता,

१. वरीष्ठ व कनिष्ठ कर्मचारी हे एकाच पदोन्नती साखळीतील पदधारक असावेत.

२. खालच्या पदावर कार्यरत असताना त्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन केव्हाही वरीष्ठ कर्मचाऱ्यापेक्षा जास्त असता कामा नये. म्हणजेच कनिष्ठ कर्मचाऱ्यास आगाऊ वेतन वाढीमुळे किंवा त्याच्य पूर्व सेवेमुळे ते वेतन वाढलेले असेल तर सदर लाभ वरीष्ठ कर्मचाऱ्यास मिळणार नाही.

३. वरीष्ठ कर्मचाऱ्याच्या पदोन्नती पूर्वीचे वेतन वेतनवाढी थांबविल्या मुळे कमी झाले असेल किंवा विनावेतन रजेमुळे वेतनवाढी लांबविल्या असतील तर सदर तरतूद लागू पडणार नाही.

४. सदर अनियमितता नियम ११ च्या अंमलबजावणीमुळे होत असावी.

उदाहरण :

"क्ष" व य हे ४०००-६००० या वेतनश्रेणीत ०१.०४.१९९६ पासून ५१०० एवढे वेतन होते. श्री. "क्ष" यांची पदोन्नती १५.०२.१९९७ रोजी झाली व श्री. "य" यांची पदोन्नती १५.०६.१९९७ रोजी झाली तर "क्ष" यांचे वेतन कमी कसे होते हे पाहू.

श्री. क्ष	**पदोन्नतीची वेतनश्रेणी**	**श्री. य**	**पदोन्नतीची वेतनश्रेणी**
४०००-१००-६०००	५०००-१५०-८०००	४०००-१००-६०००	५०००-१५०-८०००
०१.०४९६-५१००		०१.०४.१९९६-५१००	
१५.०२.१९९७ — रोजीचे वेतन ५१०० का. वे. वा + १०० एकूण ५२००	५३०० पदोन्नतीमुळे	०१.०४.१९९७ - ५२०० नियमीत वेतनवाढीमुळे	
	(५३००) ५४५० दि. १५.०६.१९९७ रोजी कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतनाएवढे वेतन वाढविणे	१५.०६.१९९७ रोजी पदोन्नती ५२०० का. वे. वा + १०० एकूण ५३००	५४५० पदोन्नतीमुळे
०१.०६.९८	५६००	०१.०६.९८	५६००

श्री. "क्ष" हे वरीष्ठ असूनही त्यांचे वेतन १५.६.१९९७ रोजी म्हणजेच कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या पदोन्नती दिवशी ५३०० आहे. परंतु कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन ५४५० एवढे निश्चित झाले आहे. ही विसंगती नियमाच्या अंमलबजावणीमुळे झाली आहे. त्यामुळे श्री. "क्ष" यांचे वेतन दिनांक १५.०६.१९९७ रोजी ५४५० एवढे उंचावून देता येईल. व पुढील वेतनवाढ दिनांक ०१.०६.१९९८ राहील. अशा प्रकरणात जुन्या पदाच्या वेतन वाढीचे दिवशी पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चितीचा विकल्प दिला तर ते फायदेशीर ठरणार आहे.

दिनांक ०१.०१.२००६ पासून नियम ११(१) (ए) मध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम १३ प्रमाणे सुधारणा झाली आहे. नविन वेतन बँडमध्ये काल्पनिक वेतनवाढ व पुढील टप्पा या संकल्पना कालबाह्य झाल्या आहेत. दिनांक ०१.०१.२००६ पासून पदोन्नतीनंतर कर्मचाऱ्यांच्या वेतन बँडमध्ये बदल झाला असेल तरी पदोन्नतीची एक वेतनवाढ देऊन त्याचे वेतन बँड मधील वेतन निश्चित करावे. तसेच नविन पदास अनुज्ञेय ग्रेड वेतन देण्यात यावे. वेतन बँडमध्ये बदल झाला असेल तर त्यास एक वेतनवाढ पदोन्नतीची देऊन येणारे वेतन हे नविन वेतन बँडच्या सुरुवातीच्या वेतनापेक्षा कमी असेल तर नविन वेतन बँडमधील सुरुवातीचे वेतन मिळेल. पदोन्नतीच्या दिवशी नविन पदास अनुज्ञेय असलेल ग्रेड वेतन त्याला देण्यात यावे. त्यामुळे दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवारी या काळात पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यास त्यांची वेतननिश्चिती पदोन्नतीच्या दिवशीच केल्यानंतर पुढील वेतनवाढ येणाऱ्या १ जुलै रोजी अनुज्ञेय आहे. तथापी दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या कालावधीत पदोन्नत कर्मचाऱ्याची वेतननिश्चिती पदोन्नतीच्या दिवशीच केली तर पुढील वेतनवाढ येणाऱ्या या १ जुलै रोजी न मिळता पुढील १ जुलै रोजी अनुज्ञेय होईल.

शासनाने या ठिकाणी पदोन्नती पुर्वीच्या पदाची वेतनवाढ देय झाल्यावर म्हणजेच दिनांक १ जुलै रोजी एक वेतनवाढ घेऊन वेतननिश्चिती करण्याचा विकल्प देण्याची तरतूद केली आहे. (शासन निर्णय दिनांक ०६.११.१९८४) या प्रकारचा विकल्प दिल्यास पदोन्नतीचे दिवशी पदोन्नतीची वेतनवाढ न देता फक्त ग्रेड वेतन बदलावे. ०१ जुलै रोजी त्या कर्मचाऱ्यास जुन्या वेतन बँड मधीन वेतन व जुन्या पदाचे ग्रेड वेतन यावर आधारित प्रथम वार्षिक वेतनवाढ देण्यात यावी. सदर वेतन वाढीची रक्कम ग्रहीत धरुन पदोन्नतीची एक वेतनवाढ देण्यात यावी. व त्याचे वेतन त्याप्रमाणे ठरवावे व पुर्वी पदोन्नतीच्या दिवशी बदलेले ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरवावे.

समान दर्जावर नियुक्ती (नियम ११ (२)) :

ज्या बदलीमुळे कर्मचाऱ्याच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होत नाही. परंतु वेतन श्रेणी बदलली जाते. त्यावेळी त्या कर्मचाऱ्याचे पूर्वीच्या वेतनश्रेणीतील जे वेतन आहे तो टप्पा नविन वेतनश्रेणीत असेल तर त्याच टप्प्यावर वेतन निश्चिती करावी. परंतु तसा टप्पा नसल्यास विद्यमान वेतनाच्या लगतपूर्व टप्प्यावर वेतन निश्चिती करुन उर्वरित फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात यावी. सदर वैयक्तिक वेतनाची रक्कम पुढील वेतनवाढीत समायोजित करावी. (नियम २३) अशा प्रकरणी वेतन वाढीची तारीख पूर्वीचीच राहणार आहे.

दिनांक ०१.०१.१९८६ पासून या नियमात सुधारणा झाली असून जबाबदाऱ्यात वाढ न होणाऱ्या प्रकरणी त्या कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती टप्पा असेल तर टप्प्यावरच करण्यात यावी. परंतु टप्पा नसेल तर नविन वेतन श्रेणीतील पुढील टप्प्यावर वेतननिश्चिती करण्यात यावी. अशा वेळी त्याचे वेतन वाढवून दिले असेल तर त्या दिवसापासून वेतन वाढीसाठी ग्राह्य कालावधी (विहित कालावधी) पूर्ण झाल्यावर (सामान्यत: १२ महिने) पुढील वेतनवाढ देय राहील मात्र पुर्वीच्याच टप्प्यावर वेतन निश्चिती झाली असल्यास वेतनवाढीच्या तारखेत बदल होणार नाही. (शासन निर्णय दिनांक ०३.०४.१९९०)

दिनांक ०१.०१.२००६ पासून वेतन श्रेणीत टप्पेच नाहीत.त्यामुळे वेतन बँड मधील वेतन तेच राहील. परंतु ग्रेड वेतन मात्र बदलावे लागेल.

पदावनतीमधील वेतन निश्चिती (नियम ११(३) तसेच नियम १२) :

कर्मचाऱ्याची पदावनती होण्याची ०३ कारणे असतात. एक म्हणजे प्रशासकीय कारणासाठी होणारी पदावनती दुसरे म्हणजे एखादे (स्थायी पद) पद नष्ट झाल्यामुळे होणारी पदावनती तिसरे म्हणजे शिक्षा म्हणून होणारी पदावनती किंवा कर्मचाऱ्याने स्वत:हून विनंती करुन खालचे पद मागितले असेल तर पदावनती होणे. अशा प्रकरणांत खालील प्रमाणे वेतननिश्चिती करता येते.

अ) एखादे स्थायी पद नाहीसे झाल्यावर त्या कर्मचाऱ्यास कमी वेतन श्रेणीचे पद दिल्यास या कर्मचाऱ्याचे पूर्वीच्या वेतनश्रेणीतील वेतन नविन पदाच्या पदाच्या वेतनश्रेणीतील कमाल टप्प्याच्या मर्यादेत संरक्षित करता येईल. म्हणजेच ५०००-१५०-८००० या वेतन श्रेणीत ६३०० वेतन होणाऱ्या कर्मचाऱ्याचे ४०००-१००-६००० या वेतन श्रेणीत नेमणूक झाल्यावर त्याचे वेतन ६००० एवढे राहील.

परंतु तो जर ५७५० एवढे वेतन घेत असेल तर त्याचे वेतन ५७००+५० वैयक्तिक वेतन एवढे राहील.

ब) जर त्याची पदावनती पदोन्ती साखळीतील पदावर म्हणजेच ज्या पदावरुन तो पदोन्नत झाला असेल त्या पदावर त्याची पदावनती झाल्यास, सदर कर्मचाऱ्याची पदोन्नती झाली नसती तर काय वेतन घेतले असते तेवढे वेतन त्यास देय राहील तसेच परत जर तो कर्मचारी पदोन्नत झाला तर त्याचे वेतन नियम ११ (१) (ए) च्या तरतुदीप्रमाणे निश्चित करावे, मात्र पदावन्नत होताना जे वेतन होत, त्यापेक्षा त्यास कमी वेतन वरत पदोन्नतीच्या दिवशी देण्यात येऊ नये (नियम ११ (४) खालील परंतुक) उदा. ४०००-१००-६००० या वेतनश्रेणीत ०१.०८.१९९८ पासून ५२०० वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याची पदोन्नती १५.०९.१९९८ रोजी झाली तसेच दिनांक १४.११.२००३ रोजी

त्याची पदावनती झाली व परत दिनांक ०१.१०.२००४ रोजी त्याची पदोन्नती झाली तर त्याची वेतननिश्चिती खालील प्रमाणे राहील.

दिनांक	मूळ वेतनश्रेणी	दिनांक	पदोन्नतीची वेतनश्रेणी	अभिप्राय
	४०००-१००-६०००		**५०००-१५०-८०००**	
१.८.९८ वे. वा. तारिख	५२००			
१५.९.९८	५२०० + १००=५३००	१५.९.९८	५४५० पदोन्नतीमुळे	नियम ११ (१) (ए) काल्पनिक वेतनवाढ
१.८.९९ वे. वा.	(५३००)	१.९.९९	५६०० वे. वा.	
१.८.२००० वे. वा.	(५४००)	१.९.२०००	५७५० वे. वा.	
१.८.२००१ वे. वा.	(५५००)	१.९.२००१	५९०० वे. वा.	
१.८.२००२ वे. वा.	(५६००)	१.९.२००२	६०५० वे. वा.	
१.८.२००३ वे. वा.	(५७००)	१.९.२००३	६२०० वे. वा.	
१४.११.२००३ मा पू.	५७००(पदावनती मुळे)	१४.११.२००३	पदावनती मा पू.	
१.८.२००४ वे. वा.	५८००			नियम ११ (४) खालील परंतुकाप्रमाणे यापूर्वी १४.११.२००३ रोजी ६२०० वेतन असल्याने त्या पेक्षा कमी वेतनावर वेतन निश्चिती करता येणार नाही. त्यामुळे पूर्वी पदावनत होताना असलेली ६२०० वेतन निश्चिती करावी लागेल. व पूर्वीची ६२०० वरील सेवा धरुन वेतनवाढ गणना करावी लागेल.
१.१०.०४ पदोन्नती	५८०० + १००=५९०० काल्पनिक वेतनवाढ	१.१०.२००४ पुढील टप्प्यावर	(६०५०) ६२०० पुन: पदोन्नतीमुळे	

दिनांक ०१.१०.२००४ रोजी त्याचे वेतन ६२०० निश्चित होईल व पुर्वी या पायरीवर केलेली सेवा पुढील वेतनवाढीसाठी ग्राह्य राहील. गणना खालीलप्रमाणे-

कालावधी		वर्ष	महिना	दिवस
१.९.०३	१३.११.०३	-	२	१३
१.१०.०४	३०.६.०५	-	९	-
१.७.०५	१७.७.०५	-	-	१७

१.७.२००५-------६,३५०/-

टिप : ज्या महिन्यात वेतनवाढीची तारीख सामान्यत: येते त्या महिन्याच्या एक तारखेपासून वेतनवाढ देय राहील म्हणून दिनांक ०१.०७.२००५

कालबद्ध पदोन्नतीची वेतन निश्चिती :

शासनाने दिनांक ०१.१०.१९९४ पासून कालबद्ध पदोन्नती योजना लागू केलेली आहे. (वर्ग ३ व वर्ग ४ साठी) दिनांक ०१.०८.२००१ पासून काही राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी ही योजना आश्वासित प्रगती योजना या नावाने सुरु केली आहे. अशा प्रकरणात कर्मचाऱ्याच्या प्रत्यक्ष जबाबदाऱ्यात वाढ होत नसली तरीही त्याला ज्या उच्च वेतनश्रेणीत कालबद्ध पदोन्नतीचा फायदा मंजूर केला आहे. त्या टप्प्यावर वेतन निश्चिती करावी. परंतु ज्यावेळी कार्यात्मक पदोन्नती होईल त्या दिवशी कोणत्याही प्रकारे वेतन निश्चिती करण्याची गरज राहणार नाही. तथापी एखादया कर्मचाऱ्याने कार्यात्मक पदोन्नती जर नाकारली किंवा तो पदोन्नतीसाठी अपात्र ठरला तर त्या दिवसापासून त्याला देण्यात आलेले कालबद्ध पदोन्नतीचे फायदे काढून घेण्यात यावे व कालबद्ध पदोन्नती मिळाली नसती तर काय वेतन मिळाले असते त्याप्रमाणे वेतन सुरु करावे. परत काही काळानंतर त्याने कार्यात्मक पदोन्नती जर स्विकारली तर पुन्हा त्याची वेतन निश्चिती नियम ११ (१) (ए) प्रमाणे करावी. मात्र अशा प्रकरणी नियम ११(४) खालील परंतुका प्रमाणेपूर्वी कालबद्ध पदोन्नतीचे लाभ काढून घेताना जे वेतन होते. त्यापेक्षा कमी वेतन देता येणार नाही या तरतुदीचा फायदा या ठिकाणी देण्यात येऊ नये. म्हणजेच नियम ११(४) खालील परंतुक येथे लागू पडत नाही. (शासन निर्णय दिनांक ०१.११.१९९५ बाब क्रमांक १६ पहा)

कालबद्ध पदोन्नतीसाठी ०१.०१.२००६ पासून वेतन निश्चिती करण्याची सुधारित तरतूद :

कालबद्ध / आश्र्वासित प्रगती योजनेअंतर्गत वेतननिश्चिती करण्याची नियमात दिनांक ०१.०१.२००६ पासून बदल झालेले आहेत. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पदोन्नत होण्याची संधी उपलब्ध आहे. अशा कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती करताना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम १३ च्या अनुषंगाने पदोन्नतीच्या दिवशी (कालबद्ध) एक वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करावी. मात्र वेतन बँड वेगळे असतील तर एक वेतन वाढ देऊन येणारे वेतन बँड मधील किमान टप्प्यापेक्षा कमी असेल तर किमान टप्प्यावर वेतन निश्चिती करण्यात यावी. तसेच नविन पदास अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन व पुर्वीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरकाच्या ५०% रक्कम जुन्या ग्रेड वेतन मध्ये मिळवून नविन ग्रेड वेतन ठरवावे. असे करताना तो फरक १०० पेक्षा कमी असेल तर नविन पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरवावे. याप्रकरणी देखील दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवारी या कालावधीत कालबद्ध पदोन्नती झाली असेल तर पुढील वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जूलै रोजी देय राहील. मात्र दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळातील कालबद्ध पदोन्नती धारकांना येणाऱ्या

जुलैमध्ये वेतन वाढ अनुज्ञेय ठरणार नाही. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ०६.११.१९८४ प्रमाणे जुन्या पदाच्या वेतन वाढीच्या तारखेस वेतन निश्चिती करण्याचा विकल्प अनुज्ञेय आहे. तसेच कार्यात्मक पदोन्नती ज्या दिवशी मिळेल त्या दिवसापासून त्याचे ग्रेड वेतन पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेल्या पूर्ण दराने द्यावे.

सदर तरतुदीमध्ये शासनाने दिनांक ३१.०८.२००९ पासून परत बदल केला असून, (जुन्य व नवीन पदाच्या) ग्रेड वेतनाच्या फरक रकमेच्या ५०% रक्कम जुन्या पदाच्या ग्रेड वेतनामध्ये मिळविण्याऐवजी नवीन पदाचे संपूर्ण ग्रेड वेतन देण्यात यावे. या सुधारणेचा परिणाम दिनांक ०१.०१.२००६ पासून होणार आहे. तथापि असे सुधारित ग्रेड वेतनाप्रमाणे अनुज्ञेय वेतन + ग्रेड वेतन दिनांक ०१.०९.२००९ पासून प्रत्यक्ष देय आहे.

दिनांक ०१.०१.२००६ ते ३१.०८.२००९ पर्यंतचा फरक देऊ नये . दिनांक ०१.०१.२००६ जे कर्मचारी कालबद्ध पदोन्नती धारक होते. त्यांच्याही बाबतीत वरीलप्रमाणे ग्रेड वेतनात सुधारणा करुन त्या अनुषंगाने येणारे वेतन दिनांक ०१.०९.२००९ पासून प्रत्यक्ष देण्यात यावे. दिनांक ०१.०१.२००६ ते ३१.०८.२००९ पर्यंतचा फरक अनुज्ञेय नाही. तसचे दिनांक ३१.०८.२००९ पूर्वी ज्या कर्मचाऱ्यांना कार्यात्मक पदोन्नती देण्यात आली आहे. त्या दिनांकापासून त्यांचे ग्रेड वेतना पदोन्नतीच्या पदाएवढे करुन त्या अनुषंगाने येणारे ग्रेड वेतन त्यांना देण्यात यावे.

दिनांक ०१.०१.२०१६ पासून या कालावधीत पदोन्नती साखळी असलेल्या कर्मचाऱ्यास त्या साखळीत पदोन्नतीच्या पदासाठी अनुज्ञेय वेतन स्तरात त्याची वेतन निश्चिती केली जाईल. असे करीत असताना त्या कर्मचाऱ्यास मूळ वेतन स्तरातील एक वेतनवाढ देऊन वेतन वाढीने वाढविण्यात यावे व ती रक्कम पदोन्नतीच्या वेतन स्तरात असल्यास त्याच टप्प्यावर नसल्या पुढील टप्प्यावर व टप्पा वेतन निश्चिती करावी.

एकाकी पदाच्या कालबद्ध पदोन्नतीची वेतननिश्चती :

ज्या पदासाठी पदोन्नतीची संधी उपलब्ध अशा पदावरील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०१.२००६ पूर्वी काही वेतनश्रेण्या ठरवून दिल्या होत्या त्या वेतन श्रेणीत वेतन निश्चिती नियम ११(१)(ए) च्या तरतुदीप्रमाणे करण्यात येत होती. दिनांक ०१.०१.२००६ पासून या तरतुदीत बदल करण्यात आलेला आहे. एकाकी पदाच्या कालबद्ध पदोन्नती बाबतीत त्याच्या वेतन बँडमध्ये बदल होणार नाही. तरी सुद्धा सुधारित नियम २००९ मधील नियम १३

प्रमाणे पदोन्नतीची वेतन वाढ अनुज्ञेय आहे. तथापि त्याचे मुळ पदाचे जे ग्रेड वेतन आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतन देण्यात यावे.

अ.क्र.	**मुळ पदाचे ग्रेड वेतन**	**अतिरिक्त पदाचे ग्रेड वेतन**
१.	२००० पेक्षा कमी	२००/-
२.	२००० ते ४००० पर्यंत	३००/-
३.	४००० ते ५००० पर्यंत	४००/-
४.	५००० पेक्षा पुढे	५००/-

दिनांक ०१.०१.२०१६ पासून अतिरिक्त ग्रेड वेतन ही संकल्पना रद्द केली आहे. एकाकी पदाच्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा फायदा देताना त्याच्या पदाचे मुळ वेतन स्तराच्या (वेतन बँड + ग्रेड वेतनाशी निगडीत वेतनस्तर) पुढील वेतनस्तरात लाभ मंजूर करावेत व पदोन्नतीप्रमाणे वेतन निश्चिती करावी.

उदाहरणार्थ : वाहन चालक

मूळ वेतन स्तर	S६
प्रथम लाभानंतरचा वेतनस्तर	S७
द्वितीय लाभानंतरचा वेतनस्तर	S८
तृतीय लाभानंतरचा वेतनस्तर	S९

या प्रकरणी ही दिनांक ०१ जुलै ते दिनांक ०१ जानेवारी या काळात फायदा घेणाऱ्यांना पुढी वेतनवाढ दिनांक ०१ जुलै रोजी अनुज्ञेय आहे.

दिनांक ०१.०१.२०१६ पासून वेतन वाढीच्या दोन तारखा झाल्या आहेत त्यामुळे दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळात वेतन निश्चिती झाल्यास पुढील वेतनवाढ दिनांक ०१ जानेवारी रोजी राहील. मात्र या कर्मचाऱ्यांनी दिनांक ०६.११.१९८४ प्रमाणे दिनांक ०१ जुलै रोजी वेतन निश्चितीचा विकल्प दिल्यास त्यांची वेतनवाढ येणाऱ्या जानेवारीस मिळणार नाही. पुढील दिनांक ०१ जुलै रोजी राहील.

त्रिस्तरीय वेतनश्रेणी / अकार्यात्मक वेतन श्रेणी :

त्रिस्तरीय वेतन श्रेणी ज्या पदांना लागू आहे त्यांचे बाबतीत विशिष्ट कालावधी पूर्ण झाल्यावर नवीन वेतन श्रेणीत वेतन निश्चिती करताना काल्पनिक वेतनवाढीचा फायादा अनुज्ञेय नाही. अशा प्रकरणी त्यांचे जुन्या वेतनाएवढा टप्पा नवीन वेतन श्रेणीत असेल तर त्याच टप्प्यावर अन्यथ: जुन्या वेतनाच्या लगतनंतरच्या पुढील टप्प्यावर नवीन वेतन ज्ञेणीत वेतन निश्चिती करावी. अशी वेतन निश्चिती ज्यावेळी जुन्याच वेतनावर होईल. त्यावेळी त्याच्या वेतनवाढीच्या तारखेत बदल होणार नाही. परंतु पुढील टप्प्यावर वेतनचिश्चिती केल्यास वेतनवाढीसाठी विहित कालावधी म्हणजेच सामान्यत: १२ महिन्यांनी वेतनवाढ मिळणार आहे. (शासन निर्णय दिनांक ०३.०४.१९९०)

दिनांक ०१.०१.२००६ पासून या नियमामध्येही सुधारणा झाली आहे. वेतन बँड मधील वेतन जर नवीन वेतन बँड आरंभीच्या वेतनापेक्षा जास्त असेल तर त्या वेतनात बदल होणार नाही. फक्त सध्याचे वेतन हे नवीन वेतन बँड मधील आरंभीच्या टप्प्यापेक्षा कमी असेल त्यावेळी मात्र त्याचे वेतन नवीन वेतनबँडच्या आरंभीच्या टप्प्यावर निश्चित होईल व ग्रेड वेतन बदलणार आहे. नवीन वेतन बँड मध्ये वेतन निश्चिती करताना वेतन जर वाढले तर दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवारी या कालावधीतील वेतन निश्चिती झालेल्यांना पुढील वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जुलै रोजी देय आहे तथापि ०२ जानेवारी ते ३० जून या कालावधीतील वेतन निश्चिती झालेल्यांना मात्र येणाऱ्या ०१ जुलै रोजी वेतनवाढ अनुज्ञेय नाही. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ०६.११.१९८४ प्रमाणे या प्रकरणीही विकल्प अनुज्ञेय आहे. (शासन निर्णय दिनंक ०५.०५.२०१० म्हणजेच वरिष्ठ / निवडश्रेणी अथवा विहित काळाने देय वेतनश्रेणी केव्हाही दिली तरी वेतन निश्चिती दिनांक ०१ जुलै रोजी करण्याचा विकल्प अनुज्ञेय आहे.)

दिनांक ०१.०१.२०१६ पासून अकार्यात्मक वेतन श्रेणी लागू केल्यावर (वेतन वाढीचा फायदा मिळणार नाहीच.) सध्याचे वेतन स्तरातील वेतन जर नवीन वेतन स्तरात उपलब्ध असेल तर तेच वेतन त्यास देय राहील व वेतन वाढ दिनांकात बदल होणार नाही. मात्र असा टप्पा नसेल तर त्याच्या वेतनाच्या लगतच्या पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती होईल ही वाढ जर दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळात असेल तर पुढील वेतनवाढ दिनांक ०१ जानेवारी रोजी देय राहील.

सेवाखंडा (नियम १४) नंतरची वेतनिश्चिती :

शासकीय सेवेमधील कर्मचाऱ्यांना सेवेत खंड पडल्यास त्या कर्मचाऱ्यास परत नियुक्ती केल्यावर वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यावर तो वेतन आहरीत करेल. तथापि असे खंड सक्षम अधिकाऱ्याने क्षमापित केल्यास खंडापूर्वीचे वेतन त्यास नव्याने नेमणूक केल्यावर देय राहू शकेल. तथापि प्रत्यक्ष सेवाखंड कालावधीची गणना करुन वेतनवाढी पुढे जातील.

वेतनश्रेणीतील बदल (नियम १५) :

शासकीय कर्मचारी ज्या वेतनश्रेणीत कार्यरत असेल ती वेतनश्रेणी उंचावण्याचा निर्णय शासन ज्या दिवशी जाहीर करेल त्या दिवशी त्याची बदली नविन वेतनश्रेणीत झाली असे समजून नियम ११ (२) च्या तरतुदी प्रमाणे करावी लागेल. टप्पा असेल तर टप्प्यावर वेतन निश्चिती होईल. टप्पा नसेल तर पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती करून वतनवाढ त्या दिनांकापासून विहित कालावधीत पूर्ण झाल्यावर देण्यात यावी. अशास प्रकरणीही कर्मचाऱ्यास विकल्प अनुज्ञेय आहे.

नियम १८ :

शासकीय कर्मचाऱ्याची बढती अथवा झाल्यानंतर जर वेतन निश्चिती चुकीची करण्यात आली त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यास अतिप्रदान झाल्यास वेतन निश्चिती नियमित करण्याचा अधिकार शासनास म्हणजेच सक्षम अधिकाऱ्यास आहे.

कार्यक्षेत्राबाहेरील कर्तव्य कालावधी (नियम ३४ व ३५) :

मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, मुख्य मंत्र्यांचे सचिव, शासनाचे सचिव किंवा काही पोलीस अधिकारी यांच्या खेरीज इतर कर्मचाऱ्यांना जर त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी जावे लागले तर त्याने सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय त्याला त्या काळातील वेतन भत्ते अनुज्ञये राहणार नाही. म्हणजेच कार्यक्षेत्राबाहेर जाण्यापूर्वी सक्षम अधिकऱ्याची परवानगी घेणे जरूरी आहे.

नियम ३६ :

वेतनवाढ जो पर्यंत रोखून ठेवली आहे असे आदेश सक्षम अधिकारी काढीत नाही तो पर्यंत ती वेतनवाढ त्या कर्मयाऱ्यास प्राप्त झाली आहे असे समजण्यात येईल. तसेच वेतनवाढ रोखून ठेवण्याचा आदेश देताना त्याचा कालावधी व भविष्यातील वेतन वाढीवर परिणाम होणार किंवा नाही किंवा रजा घेतल्यावर काय होईल, याचे आदेश त्या अधिकाऱ्याने देणे आवश्यक असते.

उदा : कर्मचाऱ्याची दिनांक ०१.०५.२००२ देय असणारी वेतनवाढ जर ०२ वर्षाकरिता थांबविली तर त्याची गणना खालील प्रमाणे होईल.

दिनांक ०१.०५.२००२ रोजीची वेतनवाढ ०२ वर्षासाठी थांबविणे

४०००-१००-६०००

	" क्ष" परिणामाशिवया		**"य" परिणामासह**
०१.०५.२००१ प्राप्त वे. वा.	५२००	०१.०५.२००१ प्राप्त वेतनवाढ	५२००
०१.०५.२००२ रोखून ठेवले	(५३००) काल्पनिक	०१.०५.२००२ रोखलेली वे. वा	---
०१.०५.२००३ रोखून ठेवले	(५४००) काल्पनिक	०१.०५.२००२ रोखलेली वे. वा	---
०१.०५.२००४ देय वेतनवाढ	५५००	०१.०५.२००४ देय वेतनवाढ	५३००

वरील क्ष येथिल वेतनवाढी प्रत्यक्ष दिल्या नसल्या तरी त्या दिल्या होत्या असे समजून दिनांक ०१.०५.२००४ रोजी वेतन रूपये ५२०० वरून ५५०० होईल. तथापि "य" येथे मात्र त्या वेतनवाढी दिल्या होत्या असे समजता येणार नाही व शिक्षा परिणामासह असल्याने दिनांक ०१.०५.२००१ च्या ५२०० वेतनावरून ते ०१.०५.२००४ रोज ५३०० होईल.

दक्षता रोध (नियम ३७) :

ज्या वेतनश्रेणीत दक्षता रोध असेल तर त्या ठिकाणी दक्षता रोध मंजूरीचे आदेश असल्याशिवाय त्या कर्मचाऱ्यास पुढील वेतनवाढ मंजूर होणार नाही.

दक्षता रोधवर रोखून ठेवलेल्या कर्मचाऱ्यास दक्षता रोध रोखून ठेवला नसता तर काय वेतन इ. असते त्यापेक्षा जास्त वेतन देता येणार नाही.

दरवर्षी जुलै महिन्यात आढावा घेऊन दक्षता रोध मंजूरीचा फेरविचार करावा.नविन वेतन संरचनेत दक्षता रोध ही संकल्पनाच नाही त्यामुळे अशी प्रकरणे यापुढे उदभवणार नाहीत.

नियम ३८ :

रजा समाप्तीनंतर अथवा पदग्रहण अवधी नंतरची अवैध अनुपस्थिती काळ वेतन वाढीसाठी ग्राह्य धरता येणार नाही.

वेतनवाढीची गणना (नियम ३९) :

वेतनवाढीसाठी ग्राह्य कालावधी मोजताना त्या विशिष्ट पायरीवरील विहित कालावधीतील सेवा पूर्ण होणे अपेक्षित आहे (सामान्यत: हा कालावधी १२ महिन्याचा असतो) तथापि व्दैवार्षिक वेतनवाढीमध्ये तो ०२ वर्षाचा असतो. सदर कालावधी पूर्ण झाल्यावर दुसऱ्या दिवशी त्याची वेतनवाढ देय होते. शासनाने वेतनवाढीच्या तारखा या प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेपासून अनुज्ञेय केले असल्यामुळे ज्या महिन्यात हा कालवधी पूर्ण होतो. त्या महिन्याच्या ०१ तारखेस वेतनवाढ देय राहील.

खालील कालावधी वेतनवाढीसाठी कर्तव्यकाळ म्हणून धरला जातो.

१. कर्तव्यकाळ म्हणजेच दैनंदिन कामकाजाचा भाग
२. वेतन देय अशी सर्व प्रकारची रजा व विशेष रजा.
३. परिवीक्षा कालवधी

परिवीक्षधीन कालावधी ०१ वर्षापेक्षा जास्त असेल तर पहिली वेतनवाढ विनावेतन रजा असल्यास वगळून नियत तारखेस अनुज्ञेय राहील. दिनांक ०१.०१.२००६ पासून वेनतवाढीच्या संकल्पनेत शासनाने बदल केल्यामुळे दिनांक ०१ जुलै रोजी जर त्या कर्मचाऱ्याने सहा महिने सेवा पूर्ण केली असेल तर त्या ०१ जुलैस पहिली वेतनवाढ देय राहील व असेस होत नसल्यास पुढील ०१ जुलै रोजी पाहिली वेतनवाढ देय राहील म्हणजेच ०१ जुलै ते ०१ जानेवारी या कालवधीत नियुक्त झालेल्याना येणाऱ्या ०१ जुलै पाहिली वेतनवाढ देय परंतु ज्यांनी नेमणूक ०२ जोनवारी ते ३० जून या काळात झाली तर पहिली वेतनवाढ येणाऱ्या ०१ जुलैस न देता पुढील ०१ जुलैस रोजी

देय राहील. (कृपया शासन निर्णय दिनांक २६.१२.२०११ पहा) पुढील वेतन वाढ मात्र परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण केल्याचे आदेश प्राप्त झाल्यावर देय होईल. परिविक्षाधीन कालावधी जर असमाधनकारक कामामुळे पुढे ढकलला तर दुसरी वेतनवाढ परिविक्षाधीन कालावधी समाधनकारक रित्या पूर्ण केल्यानंतर देय राहील. त्या दिवसापासून देय राहील. आशा वेळी कोणतेही थकबाकी अनुज्ञेय नाही. तथापि विहित परिक्षा उत्तीर्ण होण्याअभावी जर परिविक्षाधीन कालावधी पुढे ठकलला असेल तर परिक्षा उत्तीर्ण झालेल्यानंतर वेतनवाढी रोखून ठेवल्या नसत्या तर ज्या दिनांकास मिळाल्या असतया त्या दिनांकास मिळाल्या असत्या त्य दिनांका पासून त्या मुक्त होतील. फरक अनुज्ञेय राहील. (नियम ३९ अपवाद १ (२)) परंतु असमाधानकारक कामामुळे परिविक्षधिन कालावधी लाबंवलेल्या कर्मचाऱ्यास कोणतीही थकबाकी अनुज्ञेय नाही. (नियम३९ अपवाद १ (३)) ही बाब परत एकदा लक्षात घेणे गरजेचे आहे.

४. वैद्यकीय कारणास्तव घेतलेल्य असाधरण रजा वेतनवाढीसाठी ग्रह्य धरता येतात. परंतु वैद्यकीय कारणा व्यतिरिक्त घेतलेल्या असाधारण रजेमुळे (विनावेतन) तो कालावधी वगळून वेतनवाढीची गणना करावी लागेल.

शासनाने शासन निर्णय दिनांक २२.०४.२००९ मध्ये वेतनवाढी देताना नियम ३६ प ३९ च्या तरतुदीचे पालन करावे असे नमूद केल आहे. शासनाने शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन/प्र.क.३८/सेवा दिनांक २६.१२.२०११ अन्वये वैद्यकीय कारणा व्यतिरिक्त इतर कारणांसाठी असाधारण रजा (विनावेतन) घेतल्यास वेतनवाढीची गणना करणेबाबत सुस्पष्ट खुलासा केला आहे. त्या प्रमाणे मागील वर्षात ०१ जुलै पासून ३० जून या कालावधीत सहा महिन्यापेक्ष कमी कालावधीसाठी जर तो वैद्यकीय कारणा व्यतिरिक्त असाधारण रजेवर असेल तर त्यास येणाऱ्या ०१ जुलै रोजी वेतनवाढ अनुज्ञेय होईल. मात्र असा कर्मचाऱ्यास याच कालावधीत जर सहा महिन्यापेक्षा जास्त काळ वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त असाधारण रजेवर असेत तर मात्र त्यास येणाऱ्या ०१ जुलैस वेतनवाढ देय न होता ती पुढील ०१ जुलैस अनुज्ञेय होईल.

या ठिकाणी विनावेतन रजा कालावधी हा सलग असलाच पहिजे असे नाही. तो जरी खंडित असेल तरी वेतनवाढी साठीच्या अहर्ताकारी सेवेतील खंडित विनावेतन रजेची गणना करावी व निर्णय घ्यावा.

५. वरिष्ठ पदावर कार्यरत असताना ज्या कनिष्ठ पदावर तो कामय राहिला असता अशा पदावरील वेतन वाढीसाठी वरिष्ठ पदावरील सेवा ग्राह्य धरता येते.

६. प्रशिक्षण अथवा प्रतिनियुक्तीवरील काळही वेतन वाढीसाठी ग्राह्य धरला जातो.

७. संवर्गबाहय कालावधी हा ही वेतनवाढीसाठी ग्राह्य धरला जातो.

८. पदग्रहण कालावधी हा ही वेतनवाढीसाठी ग्राह्य धरला जातो.

९. निलंबन काळ जर निलंबन म्हणूनच गणला गेला तर तो वेतनवाढीसाठी ग्राह्य धरला जात नाही. तसेच याय कालावधीत अंशत: वेतन दिल्यावरही तो काळ वेतनवाढीसाठी ग्राह्य धरावा असे आदेश सक्षम अधिकारी देत नाहीत. तो पर्यंत तो काळ वेतनवाढीसाठी ग्राह्य धरता येत नाही.

१०. कुंठीत वेतनवाढ : वेतनश्रेणीच्या अंतिम टप्प्यावर पोहल्यावर वार्षिक वेतनवाढ देता येत नाही. परंतु दिनांक ०१.०१.१९८६ पासून अशा प्रकरणात अंतिम टप्प्यावर पोहचण्यापूर्वीच्या दराने दर दोन वर्षानी एक वेतनवाढ देय राहील अशा जास्तीत जास्त तीन वेतनवाढी देया राहतील. ही रक्कम सर्व बाबतीत वेतन म्हणून गणली जाईल व वेतन निश्चितीसाठी ३० सप्टेंबर १९९३ पासून ग्राह्य धरल्या जातील. दिनांक ०१.०१.२००६ पासून ही प्रथा बंद केली आहे परंतु वेतन बँड मधील अंतिम टप्प्यावर पोहचणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक वर्षानंतर पुढील वेतन बँड मंजूर करून वेतनवाढी देण्यात याव्यात. परंतु ग्रेड वेतनात कोणताही बदल करण्यात येऊ नये.

११. वेनवाढीचा दिनांक व दर याची संकल्पना दिनांक ०१.०१.२००६ पासून बदलण्यात आली आहे. येथून पुढे सर्वांना सरसकट ०१ जुलै रोजी वेतनवाढ देय राहील व त्याचा दर ३% राहील वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन या एकत्रित रकमेवर ३% ने वेतनवाढ देऊन ती रक्कम दहाच्या पटीत व पैशात आली तर अलीकडचा टप्प्यावर रकमे एवढी ती वेतनवाढ देण्यात यावी. वेतनवाढीची रक्कम दहाचे पटीनंतर एक रूपयाचे वर अपूर्णांकित आली तर पुढील दहाचे पटीतील रक्कमे एवढी ती वेतनवाढ द्यावी.

उहाहरण :

अ) ५२००-२०२०० या वेतनश्रेणी

वेतन ५२१०+१८०० ही रक्कम ७०१० एवढी होते म्हणजेच ७०१०X३=२१०.३० येतो

म्हणून वेतनावाढी रक्कम २१० येईल ती खालील प्रमाणे दाखवावी.

वेतनबँड मधील वेतन	:	५२१०
वेतन वाढ रक्कम	:	+२१०
वेतनवाढी नंतरचे वेतन	:	५४२०
ग्रेड वेतन	:	१८००

ब) ५२००-२०२०० या वेतनश्रेणीत वेतन ५२४० ग्रेड वेतन १८०० असे एकूण

७०४० येतात म्हणजेच ७०४०X३%= २११.२० ही रक्कम पुढील दशकाच्या पटीत म्हणजेच २२० होईल व वेतनवाढ खालील प्रमाणे आहे.

वेतनबँड मधील वेतन	:	५२१०
वेतन वाढ रक्कम	:	+२१०
वेतनवाढी नंतरचे वेतन	:	५४२०
ग्रेड वेतन	:	१८००

तसेच नविन वेतन संरचनेत वेतनवाढ देताना नियम ३६ व ३९ च्या तरतुदीचे पालन करावे.

आगाऊ वेतनवाढ (नियम ४०) :

आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याचे अधिकार शासनाने नियुक्ती अधिकाऱ्यास दिले आहे आगाऊ वेतनवाढ हा हक्क नसून तो सक्षम अधिकाऱ्यांचा स्वेच्छा अधिकार आहे. गोपनिय अहवालांचा आढावा व संवर्गातील संख्या यावर तो अवलंबून असतो. पाच वर्षाच्या आढाव्यामध्ये पाच सी आर (CR) A+ असतील तर दोन व ३ सी आर A+ व २ CR A असतील तर एक आगाऊ वेतनवाढ मंजूर करता येते.

सदर आढावा जुलै नंतर घेऊन ०१ ऑक्टोबर पासून अशी वेतन वाढ मंजूर करता येते. यामुळे कर्मचाऱ्याच्या नियमित वेतनवाढीवर कोणताही परिणाम होणार नाही.

कोणत्याही परिस्थितीत पाच वर्षापेक्षा कमी सेवेवर आगाऊ वेतनवाढ मंजूर करता येणार नाही. एकदा आगाऊ वेतनवाढ दिल्यानंतर पाच वर्षापर्यंत त्या कर्मचाऱ्यास परत आगाऊ वेतनवाढ देता येणार नाही. पदोन्नतीनंतर एक वर्षाचे आत जर आगाऊ वेतनवाढ मंजूर केली तर ती आगाऊ वेतनवाढ पदोन्नतीच्या दिवशीच

(खालच्या पदावर) दिली असे समजून पदोन्नतीच्या पदाची फेर वेतननिश्चिती करण्यात यावी व त्याप्रमाणे जे वेतन अनुज्ञेय होईल ते वेतकन त्या कर्मचाऱ्यास आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकापासून देण्यात यावे.

नविन वेतन संरचनेत म्हणजेच ०१.०१.२००६ नंतर आगाऊ वेतनवाढी कशा मंजूर कराव्यात याबाबत शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत.

शासनाने दिनांक ०१.०१.२००६ ते ३१.१२.२०१५ या काळात आगावू वेतन वाढ अनुज्ञेय नाही.

नियम ५६ :

एका पेक्षा अधिक पद धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यास म्हणजेच स्वत:चे काम संभाळून अतिरिक्त कार्यभार स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्यास या कामाचा मोबदला म्हणून विशेष वेतन मंजूर करण्यात येते. सदर कर्मयाऱ्याने तर अतिरिक्त कार्यभाराचे पद नियतित स्वरूपात धारण केले असते तर त्यानी जे वेतन अहरित केले असते. त्या संभाव्य वेतनाच ५% किंवा रूपये १५००/- यातील जे कमीत कमी असेल तेवढे अतिरिक्त वेतन मंजूर करता येते. या ठिकाणी अतिरिक्त कार्यभार हा १६ दिवसापेक्षा ज्ञास्त असला पाहिजे व सहा महिन्यापेक्षा कमी असला पाहिजे.

शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०१.०६.२०१५ अन्वये अशा प्रकारणी कर्मचाऱ्यास स्वत:च्या पदाचा वेतनाच्या ५% रक्कम विशेष वेतन म्हणून अनुज्ञेय राहील व रु १५००/- ही कमाल मर्यादा रद्द केली आहे. याची अंमलबजावणी दिनांक ०१.०६.२०१६ पासून करावयाची आहे.

वेतन पडताळणी मुद्दे :

संचालनालय, लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील विभागीय सहसंचालक, यांचे कार्यालयात सेवा पुस्तक पाठविणे पूर्वी खालील पूर्तता करण्यात यावी म्हणजे आक्षेपांचे प्रमाण कमी राहू शकेल.

१. शासनाने ठरवून दिलेल्या वेतनश्रेणीत वेतन घेतले का?

२. वतेनश्रेणीच्या सुरवातीच्या वेतनावर सुरूवात आहे का अधिक वेतन दिले आहे, असल्यास तशी तरतूद आहे काय?

३. वार्षिक वेतनवाढी नियमित केल्या का?

४. विनावेतन रजा खाजगी कारणास्तव असेल तर वेतनवाढ पुढे ठकलण्याची कार्यवाही केली आहे काय?

५. पदोन्नती वेतननिश्चिती बरोबर आहे काय? विकल्प दिला आहे काय? अथवा सेवापुस्तकामध्ये नोंद आहे काय?

६. वेतन रचनेच्यावेळी विकल्प दिला आहे काय? तो विहित कालमर्यादेत आहे काय?

७. यापूर्वी वेतन पडताळणी झाली आहे काय? झाली असल्यास त्या तरखेनंतर वेतन पडताळणी करण्याचे तारखेपर्यंतच्या वेतनवाढीसह प्रत्येक प्रसंगाची वेतन निश्चिती नियमानुसार आहे अथवा नाही?

८. आगाऊ वेतनवाढी सक्षम अधिकाऱ्यांनी दिला आहे काय? अंतिम टप्प्यावर पोहचल्यावरही ती दिली आहे काय? पदोन्नती नंतर एक वर्षाचेनंतर आगाऊ वेतनवाढ दिली आहे काय?

९. ज्या विभागीय परिक्षा पास झाले नाही म्हणून वेतनवाढी थांबविण्याची गरज असते ती उत्तीर्ण आहे काय? नसल्यास वेतनवाढी थांबविल्या आहेत काय?

१०. हिंदी, मराठी भाषा नोंद सूट नसल्यास वेतनवाढी थांबलिल्या आहेत काय?

कनिष्ठाप्रमाणे वेतनवाढ दिल्यास मानांकाप्रमाणे कार्यवाही न करणे.

थोडक्यात महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ व सुधारित नियम १९८८/१९९८/२००९ या मधील तरतुदीचा काटेकोर पालन झाले आहे का नाही हे पाहणे.

सातवा वेतन आयोगावर दृष्टिक्षेप

शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर/२०१९/प्र.क्र. १/सेवा.९, दिनांक ३०.०१.२०१९.

शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक वेपूर/२०१९/प्र.क्र. ८/सेवा९, दिनांक २०.०२.२०१९

पूर्ण वेळ कर्मचारी व वेतनश्रेणी घेणारे कर्मचारी ह्यांना लाभ. कंत्राटी / दैनंदिन रोजगार पुन: नियुक्त कर्मचारी ह्यांना लागू नाही.

व्याख्या:

विद्यमान मूळ वेतन : वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन (विशेष वेतन सोडून) + वैयक्तिक वेतन असल्यास (शा. प. दिनांक २०.०२.२०१९ परिच्छेद ७.४)

विद्यमान वित्तलब्धी : वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन + वैयक्तिक वेतन असल्यास + त्यावरील महागाई भत्ता.

वेतन मॅट्रीक्स / वेतन स्तर : वेतन बँड मधील ग्रेड वेतनानुसार निर्धारित उच्च प्रारंभिक वेतनाच्या अनुषंगाने तयार केलेले स्तर किंवा वेतन श्रेणी.

वेतन स्तरातील सेल : प्रत्येक वेतन स्तरात किमान वेतन ते कमाल वेतन ह्या दरम्यान ३ % प्रमाणे तयार केलेले वेतनवाढीचे टप्पे.

सुधारित मूळ वेतन : विहीत वेतन स्तर / वेतनामध्ये ज्या पायरीवर (टप्पा किंवा Cell) रक्कम आहरीत करतो ते मूळ वेतन यामध्ये विशेष वेतनाचा समावेश होत नाही. पण असल्या वैयक्तिक वेतन.

सुधारित वित्तलब्धी : वेतन स्तरात / वेतन श्रेणीतील आहरीत करीत असलेले मूळ वेतन + महागाई भत्ता.

सुधारित वेतनाची अमंलबजावणी : दिनांक ०१.०१.२०१६ सर्वांना लागू पण ०१.०१.२०१६ किंवा त्या नंतर नियुक्त / पदोन्नत / बदलीहून आलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदास लागू केलेल्या वेतन मॅट्रीक्स / वेतन स्तर **मध्येच** वेतन अनुज्ञेय राहील.

दिनांक ०१.०१.२०१६ रोजी सेवेतील कर्मचाऱ्यांना नवीन वेतन स्तरामध्ये दिनांक ०१.०१.२०१६ पासून अथवा पुढील वेतन वाढीपासून सुधारीत व वेतन घ्यावयाचे याचा विकल्प देता येईल.

दिनांक ०१.०१.२०१६ रोजी निलंबित असणाऱ्यांना सदर नियम लागू नाहीत. दिनांक ०१.०१.२०१६ रोजी निलंबाधीन कर्मचारी पुन:स्थापीत झाल्यावर एक महिन्याचे विकल्प देता येऊ शकेल.

जे कर्मचारी एक महिन्यात विकल्प देणार नाहीत त्यांनी सुधारीत वेतन दिनांक ०१.०१.२०१६ पासून निवडले आहे समजण्यात येईल. दिनांक ०१.०१.२०१६ रोजी किंवा त्यानंतर ज्यांना काढून टाकले / बडतर्फ केले/ मृत्यू पावले / राजीनामा दिले त्यांनाही विकल्प देता येईल व न दिल्यास दिनांक ०१.०१.२०१६ पासून ते लाभ मिळण्यास पात्र ठरतील.

दिनांक ०१.०१.२०१६ नंतर मृत्यू पावलेल्यांचा बाबतीत त्यांना ज्या तारखेस लाभ स्वीकारण्यामुळे त्यांचा जास्त फायदा होईल त्या प्रमाणे त्यांनी विकल्प दिला असे समजण्यात येईल. कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.

दिनांक ०१.०१.२०१६ च्या आधीपासून जे कर्मचारी वैद्यकीय कारणास्तव असाधारण रजेवर आहेत व दिनांक ०१.०१.२०१६ नंतर कामावर हतर न होता जे निवृत्त होतील / मृत्यू पावतील त्यांची वेतन निश्चिती करण्यात यावे व त्यावर आधारीत निवृत्ती वेतन विषय लाभ मंजूर करावेत. वेतनाची थकबाकी अनुज्ञेय नाही. वैद्यकीय कारणा व्यतिरिक्त कारणास्तव जे असाधारण रजेवर असतील व सेवेत न येता निवृत्त होतील / मृत्यू पावतील त्यांना सुधारीत व वेतनाचा लाभ अनुज्ञेय नाही. नियम ७ टिप (१) क (२)

वेतन निश्चिती :

दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन X २.५७ या प्रमाणे येणारी रक्कम नजीकच्या रुपयात पूर्णांकित करावी. सदर रक्कम वेतन स्तरावरील (वेतन श्रेणी / मॅट्रीक्स) सेलमध्ये (टप्प्यावर) असल्यास त्या टप्प्यावर वेतन निश्चिती करावी. ती रक्कम सुधारीत वेतन स्तरात नसल्यास पुढील सेलमधील (टप्प्यावरील) रक्कम सुधारीत वेतन निश्चिती होईल.

सदर रक्कमेपेक्षा वेतन स्तरातील किमान वेतन अथवा प्रथम सेल (टप्पा) मधील रक्कम जास्त असल्यास त्यांची वेतन निश्चिती सुरुवातीच्या टप्प्यावर होईल. अशी वेतन निश्चिती करताना जर दोन किंवा त्याहून अधिक टप्प्यावर असुधारीत वेतन घेणाऱ्यांचे वेतन सुधारीत वेतन स्तरात एकाच टप्प्यावर निश्चित झाल्यास ते एकवटले (Bunches) असे मानता येईल.

अशा वेळी प्रत्येक दोन टप्प्यांना सुधारीत वेतन स्तरात एक वेतन वाढ देण्यात यावी. असे करताना त्यांचे सुधारीत वेतनातील दोन टप्प्यामधील फरक ३% पेक्षा कमी असल्यास हा फायदा देता येणार नाही. शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २२.०४.२००९ मधील जोडपत्र क्रमांक ३ प्रमाणे नव नियुक्तांना दिलेले उच्च प्रारंभिक वेतनापेक्षा त्या वेतन बँडमध्ये कमी वेतन घेणाऱ्याचे वेतन यासाठी एकसारखे मान्यता येणार नाही.

असुधारीत वेतन बँडमध्ये जे अंतिम टप्प्यावर वेतन वेतनबँडचे घेऊन दोन वर्षापेक्षा + कुंठीत झाला आहेत त्यांना दर दोन वर्षास एक वेतन वाढ देण्यात यावी. सदर फायदा PB 1/ 2/ 3 ह्यांना मिळणार नाही कारण त्यांना ह्या पुर्वी कुंठीत घालविण्यासाठी पुढील वेतन बँड दिला होता. त्यामुळे PB-4 ३७४००- ६७००० मधील कर्मचाऱ्यांनाच हा लाभ देय राहील.

उदाहरणार्थ :

	३७४००- ६७००
दिनांक ०१.०७.२०११ पासून	६७००० + ८७०० ७५७००
दिनांक ३१.१२.२०१५ चे वेतन	७५७०० X २५७ १९४५४९
S २७ मध्ये दिनांक ०१.०७.२०१६ रोजी येणारा टप्पा (Cell)	१९५९००
४ वर्ष कुंठितता आहे म्हणून	१) २०१८०० वेतन वाढ २) २०७९०० वेतन वाढ
२ वर्षास एक या प्रामणे दोन वेतन वाढीचे वेतन देऊन	
दिनांक ०१.०१.२०१६ चे वेतन	२०७९००
दिनांक ०१.०७.२०१६ ची वेतन नियमित वाढ	२१४१००

विलीनीकरणाची तरतूदीमुळे एक वेतनवाढ :

ग्रेड वेतनानुसार जर दोन ग्रेड वेतनास मिळून एकच वेतन स्तर दिला असेल तर विलीनीकरण झाले आहे आणि त्यापैकी एक पद पदोन्नतीचे असेल तिथे वेतन निश्चिती करीत असताना पदोन्नती सवंर्गातील कर्मचाऱ्यांचे वेतन खालच्या संवर्गातील कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनांपेक्षा कमी निश्चित झाले असल्यास वरिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन तेवढे रक्कमेपर्यंत दिनांक ०१.०१.२०१६ रोजी उंचवावे व पुढील वेतन वाढ दिनांक ०१.०७.२०१६ रोजीच देण्यात यावी.

दिनांक ०१.०१.२०१६ नंतर पदोन्नतीतील सवंर्गातील कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्याचे वेतनापेक्षा जास्त झाले तर अटी शर्तीचे अधीन राहून उंचावून देण्यात यावे.

१) कनिष्ठ व वरिष्ठ कर्मचारी पदोन्नतीच्या एकाच साखळी संवर्गातील पदावर कार्यरत असावेत.

२) दोन्ही म्हणजे जुनी व सुधारीत वेतन श्रेणी समरुप असाव्यात.

३) विसंगती ही अन्य नियमामुळे केलेली वेतन निश्चिती मुळे उद्‌भवलेली नसावी.

४) कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन आगावू वेतनवाढीमुळे जास्त झालेले नसावेत किंवा वरिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन विनावेतन रजा वा शिक्षा म्हणून वेतनवाढ पुढे गेलेल्या नसाव्यात.

दिनांक ०१.०१.२०१६ नंतर नव नियुक्तांना वेतन स्तराच्या किमान टप्प्यावर त्याचे वेतन निश्चित करण्यात येईल. दिनांक ०१.०१.२०१६ ते दिनांक ३०.०१.२०१९ या कालावधीत नियुक्त कर्मचाऱ्यांचे विद्यमान वेतन + महागाई भत्ता व हे सुधारीत वेतन + महागाई भत्ता यापेक्षा कमी असल्यास फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात यावी व पुढील वेतन वाढीत सामावून घ्यावी. सदर प्रकरण अपवादात्मक असू शकतील. उच्च प्रारंभिक वेतन + ग्रेड वेतन एकत्र करुन त्यावर २.५७ ने गुणून वेतन स्तर तयार केला व यामध्ये २.५७ मधून २.२५ वजा करता ०.३२ ही रक्कम कर्मचाऱ्यांना सरकारने जादा दिलेली आहे. (३२% Fitment benefit) त्यामुळे अशा तऱ्हेने वेतन सहसा कमी होणार नाही.

पुढील वेतनवाढ दिनांक ०१ जुलै रोजी सहा महिन्यापेक्षा अधिक सेवा झाल्यास येणाऱ्या ०१ जुलै रोजी अन्यथा ०१ जानेवारी रोजी देय राहील. म्हणजेच त्यांची नियुक्ती दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवारी या काळात झाली असेल त्यांना वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जुलैस व ज्यांची नियुक्ती ०२ जानेवारी ते ३० जून याकाळात झाली. त्यांना वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जानेवारीस मिळेल.

सुधारीत वेतन संरचनेत वेतनवाढी :

१) सामान्यत: कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती दिनांक ०१.०१.२०१६ रोजी केल्यावर पुढील वेतनवाढ दिनांक ०१.०७.२०१६ रोजी देय राहील.

२) ठरावीक वेतनावर ६ महिने आर्हताकारी सेवा हे तत्व पालन करुनच वेतनावाढ वर्षातून एकदाच अनुज्ञेय.

३) ज्या कर्मचाऱ्यांची वेतनवृद्धी पदोन्नती/ आश्वासित प्रगती योजने/ पदोन्नती मुळे होणार आहे. त्यांचेसाठी वेतनवाढी खालीलप्रमाणे नियमित होतील.

दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळातील पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांनी विकल्प न देता पदोन्नतीच्या दिवशी वेतन निश्चिती करुन घेतली तर त्यांना पुढील वेतनवाढ येणाऱ्या ०१ जानेवारी रोजी देय राहील.

४) जे कर्मचारी दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवारी या काळात पदोन्नत होतील व त्यांची वेतन निश्चिती पदोन्नतीच्या दिवशी होईल त्यांना येणाऱ्या दिनांक ०१ जुलै रोजी वेतनावाढ देय राहील.

५) जे कर्मचारी दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळात पदोन्नतीच्या पदावर हजर होतील पण विकल्प देऊन दिनांक ०१ जुलै रोजी नियमित वेतनावाढीसह पदोन्नतीची वेतन वाढ स्वीकारुन वेतन निश्चिती करुन घेतील. त्यांना वेतन वाढ दिनांक ०१ जानेवारीत मिळणार नाही ती दिनांक ०१ जुलै रोजीच मिळेल. (कृपया नियम १० व १३ पहा)

दिनांक ०१.०१.२०१६ नंतर नियुक्त कर्मचारी

तपशील	१	२	
वेतन बँड ग्रेड वेतन	९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४३००	५२००-२०२०० + ग्रेड वेतन १९००	९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४४००
उच्च प्रारंभिक वेतन असल्यास	१०१०० + ४३०० १४४००	५८३० + १९०० ७७३०	१०९०० + ४४०० १५३००
नवीन वेतन स्तर व किमान कमाल मर्यादा	एस १४ ३८६००-१२२८००	एस ६ १९९००-६३२००	एस १५ ४१८००-१३२३००
नियुक्तीचा दिनांक	०८.०८.२०१६	०१.०१.२०१७	०८.०२.२०१७
नियुक्तीच्या दिवसाचे वेतन	३८६००	१९९००	४१८००
पुढील वेतनवाढ	०१.०७.२०१७	०१.०७.२०१७	०१.०१.२०१८
वेतनवाढी नंतरचे वेतन	३९८००	२०५००	४३१००

उदाहणार्थ : S ६ मध्ये वेतन घेणारा कर्मचारी दिनांक ०१.०७.२०१७ पासून २३१०० एवढे वेतन घेतो आहे. त्याची पदोन्नती S ८ मध्ये दिनांक १७.०२.२०१८ पासून झाली. त्याने पुढील वेतनवाढीवर वेतन निश्चिती करण्याचा विकल्पाची दिलेला नाही तर त्याची वेतन निश्चिती खालीलप्रमाणे होईल.

श्री 'अ' कर्मचारी

तारीख	**S६ १९०००-६३२००**		**S८ २५५०० - ८११००**	
०१.०७.२०१७	२३१००		-	
१७.०२.२०१८	२३१०० + २३८००	पदोन्नतीची वेतनवाढ देऊन येणारे वेतन	२५५००	२३८०० ही पायरी S८ मध्ये नाही त्यामुळे किमान वेतनावर निश्चित.
पुढील वेतनावाढीचा दिनांक ०१.०१.२०१९ व वेतन	-		२६३००	

टिप : S८ मधील किमान वेतन २५५०० हे जास्तीचे असल्यास विकल्प घेऊ नये.

पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चिती

नियम १३ : दिनांक ०१.०१.२०१६ नंतर पदोन्नत कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती करीत असताना पदोन्नत कर्मचाऱ्याचे वेतन एका वेतनवाढीत वाढविण्यात येईल. (एक वेतनवाढ देण्यात येईल) व ही वेतनवाढ देऊन जी रक्कम येईल ती रक्कम पदोन्नती / कालबद्ध पदोन्नतीची वेतन स्तरातील Cell मध्ये (पायरीवर) असेल तर वेतन निश्चिती त्याच Cell म्हणजेच टप्प्यावर होईल. मात्र अशी टप्पा नसेल तर त्या पुढील टप्प्यावर (Cell) वर पदोन्नतीची वेतन निश्चिती होईल.

वेतनवाढीची तारीख खालीलप्रमाणे राहील.

१) ०१ जुलै ते ०१ जानेवारी

या काळात पदोन्नती झाली तर वेतनवाढ येणाऱ्या ०१ जुलै रोजी देय राहील.

२) दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळात पदोन्नती झाली व ०१ जुलै रोजी कोणतीही वेतनवाढ देय झाली नसेल (विकल्प दिल्यामुळे) तर पुढील वेतनावाढ येणाऱ्या ०१ जानेवारी रोजी देय राहील.

श्री ‘अ’ हा कर्मचारी दिनांक ०१.०७.२०१७ रोजी S६ मध्ये ३०२०० एवढे वेतन घेत आहे. दिनांक १७.०२.२०१८ रोजी त्याची पदोन्नती S८ मध्ये झाली. तथापि त्याने दिनांक ०१.०७.२०१८ रोजी मुळ पदाची वेतनवाढ घेऊन पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चिती करण्याचा विकल्प दिला. तर त्याची वेतन निश्चिती खालीलप्रमाणे होईल.

श्री ‘अ’ कर्मचारी – विकल्पावर वेतन निश्चिती

तारीख	**S६** **१९०००-६३२००**		**S८** **२५५०० - ८११००**
०१.०७.२०१७	३०२००	-	-
१७.०२.२०१८ चे वेतन	३०२००	पदोन्नत पण दिनांक ०१.०७.२०१८ या विकल्प दिला त्यामुळे S८ मधील पुढील टप्पा	३०५००
दिनांक ०१.०७.२०१८ रोजीचे नियमीत वेतनवाढ	३११००	-	-
दिनांक ०१.०७.२०१८ रोजी पदोन्नतीची वेतनवाढ	३२०००	३२००० हा Cell S८ मध्ये नाही त्यामुळे त्यापुढील सेलवर पायरीवर वेतननिश्चिती होते	३२३००
पुढील वेतन वाढ दिनांक ०१.०७.२०१९	-	-	३३३००

जर सदर कर्मचाऱ्याने विकल्प दिला नसता तर त्याचे वेतन निश्चिती दिनांक १७.०२.२०१८ रोजी खालीलप्रमाणे झाली असती.

श्री ‘ब’ कर्मचारी – विकल्पाशिवाय वेतन निश्चिती

तारीख	**S६** १९९००-६३२००		**S८** २५५०० - ८११००
०१.०७.२०१७	३०२००	-	-
१७.०२.२०१८ रोजी पदोन्नतीची वेतनावाढीने येणारे वेतन	३११००	३११०० हा Cell S८ मध्ये नाही त्यामुळे S८ मधील पुढील Cell वर वेतन निश्चिती	३१४००
दिनांक ०१.०१.२०१९ रोजीचे वेतनवाढीनंतर वेतन	-	-	३२३००

प्रस्तुत प्रकरणात दिनांक ०१.०७.२०१८ रोजीची वेतनावाढ घेऊन वेतन निश्चिती करण्याचा विकल्प देऊन केलेली वेतन निश्चिती लाभदायक ठरेल.

एकाकी पदावरील कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती करत असल्यास याठिकाणी मूळ वेतनस्तर / पाहिल्या लाभानंतर / द्वितीय लाभानंतर / तृतीय लाभानंतर हा विचार करावा लागेल. उदाहरणार्थ वाहनचालक हे पद एकाकी असून सहाव्या वेतन आयोगानुसार त्यास जो नवीन वेतन स्तर आहे तो त्याचा मूळ वेतन स्तर राहील. त्याचे ग्रेड वेतन १९०० आहे.

वाहन चालक

मूळ वेतन स्तर	S६	१९९०० ते ६३२००
प्रथम लाभानंतरचा वेतनस्तर	S७	२१७०० ते ६९१००
द्वितीय लाभानंतरचा वेतनस्तर	S८	२५५०० ते ८११००
तृतीय लाभानंतरचा वेतनस्तर	S९	२६४०० ते ८३६००

एकाकी पदासाठी आश्वासित प्रगती योजनेतील वेतन निश्चिती करताना नियम १३ च्या तरतुदी प्रमाणे पदोन्नतीची एक वेतन वाढ देऊन येणारी रक्कम नवीन वेतनस्तरात असेल तर त्याच टप्प्यावर (Cell वर) वेतन निश्चिती करावी. नसल्यास पुढील टप्प्यावर (Cell वर) वेतन निश्चिती करावी.

या ठिकाणी नियम १३ प्रमाणे वेतन निश्चिती करताना एकाकी पदधारकांना शासन निर्णय दिनांक ०६.११.१९८४ व नियम १३ नमुद केल्याप्रमाणे विकल्प देता येईल.

विकल्प दिल्यास पदोन्नतीच्या दिवशी नवीन वेतनस्तरात पुढील टप्प्यावर (Cell वर) वेतन निश्चिती करावी. दिनांक ०१ जुलै रोजी त्यास एक नियमित वेतनवाढ व दुसरी पदोन्नतीची वेतनवाढ द्यावी व सदर रक्कम नवीन वेतनस्तरात असल्यास त्याच पायरीवर (Cell वर) नसल्यास पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती होईल.

दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवरी या काळात ही घटना घडल्यास वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जुलैस व दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळात घटना घडल्यास व नियमित विकल्प वेतन वाढीचा दिला नाही तर वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जानेवारी रोजी मिळेल.

अकार्यात्मक पदाची वेतन निश्चिती:

शासकीय कर्मचाऱ्यांना अकार्यात्मक वेतनश्रेण्या दिल्या आहेत त्याची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करावी. उदाहणार्थ आरेखक/ अनुरेखक/ मंत्रालयातील कक्ष अधिकारी / शिक्षक वर्गीय कर्मचारी

१. अशा कर्मचाऱ्यांना ठराविक कालानंतर वाढीव वेतन श्रेण्या/ वेतनस्तर मंजूर केले असतील पण त्यांच्या जबाबदाऱ्यात वाढ होत नाही त्यांना अकार्यात्मक वेतन स्तर म्हणता येईल.

   ज्या दिवशी नवीन वेतनस्तर मंजूर केला जाईल. (३ वर्षे/ ७ वर्षे/ १२ वर्षे/ २४ वर्षे) त्या दिवशी मूळ वेतन स्तरातील वेतनाएवढी रक्कम जर नवीन अकार्यात्मक वेतन स्तरात असेल तर त्याच टप्प्यावर (Cell वर) वेतननिश्चिती होईल व वेतनवाढीचा दिनांक बदलणार नाही.

२. जर मूळ वेतन स्तरातील वेतनाएवढी रक्कम नवीन अकार्यात्मक वेतनश्रेणीत नसेल तर पुढील टप्प्यावर (Cell वर) वेतन निश्चिती करण्यात यावी. जर अशा प्रकारे वेतन निश्चितीची जर दिनांक ०१ जुलै ते ०१ जानेवारी या काळात घडली तर वेतनवाढीची तारीख येणाऱ्या दिनांक ०१ जुलै राहील.

   मात्र ही वाढ जर दिनांक ०२ जानेवारी ते ३० जून या काळात झाली तर पुढील वेतनवाढ येणाऱ्या दिनांक ०१ जानेवारी रोजी राहील.

शासन अधिसूचना वित्त विभाग दिनांक ३०.०१.२०१९ मधील नियम १०, १३ व दिनांक ०६.११.१९८४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने येणारी अंदाजित वेतन निश्चितीची उदाहरणे पुढीलप्रमाणे :

टिप: दिनांक ३०.०४.२०१९ पर्यंतच्या शासन निर्णयाप्रमाणे सदर टिप्पणी तयार केली आहे. त्यानंतर शासनाने जर बदल केले तर त्या अनुषंगाने प्रत्यक्ष कामकाजात बदल करावेत.

उदाहरण क्रमांक : १

वेतन बँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४४०० मध्ये दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी वेतन घेणाऱ्या श्री दत्तात्रय दवे यांची वेतनस्तर S१५ ४१८०० ते १३२३०० मध्ये दिनांक ०१.०१.२०१६ ची वेतन निश्चिती.

अ. क्र.	तपशील	मूळ पद	पदोन्नती पद
१.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे विद्यमान वेतन	18440 + 4400 22840	
२.	विद्यमान वेतन बँड ग्रेड वेतन	9300 34800 + 4400	
३.	दिनांक ०१.०१.२०१६ चा विद्यमान वेतन X २.५७ प्रमाणे येणारी रक्कम	22840 X 2.57 = 58698.80 i.e. 58699	
४.	सदर रक्कमेएवढा दुसरा टप्पा S१५ 41800 ते 132300 मध्ये आहे काय?	नाही.	
५.	दिनांक ०१.०१.२०१६ ची वेतन निश्चिती	59600	
६.	पुढील वेतनवाढ दिनांक व रक्कम दिनांक ०१.०७.२०१६ दिनांक ०१.०७.२०१७ दिनांक ०१.०७.२०१८	 61400 63200 65100	

उदाहरण क्रमांक : २

वेतन बँड १५६०० - ३९१०० + ग्रेड वेतन ५४०० मध्ये वेतन घेणाऱ्या श्रीमती प्रज्ञा यांची वेतन स्तर S२० ५६१०० ते १७७५०० मध्ये दिनांक ०१.०१.२०१६ ची वेतन निश्चिती व दिनांक १८.०२.२०१८ रोजी झालेल्या पदोन्नतीची वेतन निश्चिती.

अ. क्र.	तपशील	मूळ पद S२० 56100 ते 177500	पदोन्नती पद S२३ 67000 ते 208700
१.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे विद्यमान वेतन	23970 + 5400 29370	
२.	विद्यमान वेतन बँड ग्रेड वेतन	15600 - 39100 + 5400	
३.	दिनांक ०१.०१.२०१६ चा विद्यमान वेतन X २.५७ प्रमाणे येणारी रक्कम	29370 X 2.57 = 75480.90 i.e. 75481	
४.	सदर रक्कमेएवढा दुसरा टप्पा S२० मध्ये आहे काय?	नाही.	
५.	दिनांक ०१.०१.२०१६ ची वेतन निश्चिती	77700	
६.	पुढील वेतनवाढ दिनांक व रक्कम दिनांक ०१.०७.२०१६ दिनांक ०१.०७.२०१७ दिनांक ०१.०७.२०१८	 80000 82400 84900	
७.	वेतन बँड 15600-39100 ग्रेड वेतन 6600 मध्ये दिनांक १८.०२.२०१८ पदोन्नती	-	-
८.	पदोन्नतीसाठीचा वेतन स्तर S२३ 67000 ते 208700		67000 ते 208700
९.	दिनांक ०१.०७.२०१८ ची वेतनावाढ घेऊन वेतन निश्चितीचा विकल्प	-	-
१०.	दिनांक १८.०२.२०१८ रोजी S २३ मध्ये पुढील टप्प्यावर वेतननिश्चिती	दिनांक ०१.०७.२०१७ चे वेतन 82400 च्या S २३ मधील पुढील टप्पा	83300
११.	दिनांक ०१.०७.२०१८ रोजीची नियमित वेतनवाढ	84900	
१२.	दिनांक ०१.०७.२०१८ रोजी पदोन्नतीची वेतनवाढ	87400	
१३.	सदर टप्पा S२३ मध्ये आहे काय ? असल्यास त्याच टप्प्यावर वेतन निश्चिती नसल्यास पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती पुढील वेतनवाढ दिनांक व रक्कम	नाही दिनांक ०१.०७.२०१९	88400 91100

उदाहरण क्रमांक : ३

सार्वजनिक बांधकाम खात्यातील अनुरेखन या संवर्गातील अकार्यात्मक वेतन स्तरामध्ये करावयाची वेतन निश्चिती. कर्मचाऱ्याची नेमणूक दिनांक ११.११.२०११ रोजी झालेली आहे.

अ. क्र.	तपशील	प्रथम सात वर्षाची वेतनश्रेणी	सात वर्षानंतरची वेतनश्रेणी
१.	दिनांक ०१.०१.२०१६ चा विद्यमान वेतन बँड व ग्रेड वेतन	5200-20200 ग्रेड वेतन 2000	5200-20200 ग्रेड वेतन 2400
२.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजीची सुधारीत वेतन स्तर	S7 21700 ते 69100	S8 25500 ते 81000
३.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे विद्यमान श्रेणीतील वेतन + ग्रेड वेतन	7540 + 2000 = 9540	-
४.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे विद्यमान 9540 X 2.57 = 24517.78 ie 24518 (नजीकच्या रुपयात राऊडींग)	24518	-
५.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजी सुधारीत वेतनस्तर S७ मध्ये 24518 पायरी आहे काय?	नाही	-
६.	दिनांक ०१.०१.२०१६ रोजी पुढील पायरीवर (Cell वर)	25200	-
७.	पुढील वेतनवाढ व वेतन दिनांक ०१.०७.२०१६ दिनांक ०१.०७.२०१७ दिनांक ०१.०७.२०१८	 26000 26800 27600	-
८.	दिनांक ११.११.२०१८ रोजी सात वर्ष पूर्ण अकार्यत्मक वेतन स्तर मध्ये वेतन निश्चिती दिनांक ११.११.२०१८ रोजीचे वेतन	27600	25500 - 81000
९.	वेतनस्तर S८ मध्ये 27600 पायरी आहे काय?	-	नाही
१०.	वेतनस्तर S8 मध्ये दिनांक ११.११.२०१८ रोजी वेतन निश्चितली पुढील Cell वर	-	27900
११.	पुढील वेतनवाढ दिनांक ०१.०७.२०१९ व वेतन	-	28700

पदोन्नतीनंतर विकल्प देण्यापूर्वी खात्री कशी करावी हे दर्शविणारे उदाहरण

Shri. D Working in S-23 promoted in S-25 w.e.f. date 01/04/2019 which option is beneifited to Shri. D is as under :

Sr. No.	Particulars	Pay in S-23 67700 to 208700	Pay to be fixed in S-25 as on promotion 01/04/2019	Pay to be fixed in S-25 as on date 01/07/2019 as per option 78800 to 209200	(+) (-)
1.	Pay as on date 01/04/2019 in S-23	99500	-	-	-
2.	Promotional Increment on date 01/04/2019	102500			
3.	102500 in not stage in S-25 & here pay on next stage		102800	(99800) (-)	3000 X 3 = 9000
4.	As per option as on date 01/04/2019 his pay 99500 and hence next stage in promotional pay matrix	99500		99800	
5.	Regular increment as on date 01/07/2019	102500			
6.	Promotional increment as on date 01/07/2019	105600			
7.	105600 is not stage in S-25 an hance pay to be fix on next stage		(102800)	105900	3100 X 6 = 18600 (+)
8.	INC as on date 01/01/2020		105900	(105900)	Nil
9.	INC as on date 01/07/2020		(105900)	109100	3200 X 6 = 19200

Date 01/04/2019 to 30/06/2020 15 months he will get more 37800 (-) 9000 = 28800